POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१७५ ● मुंबई, सोमवार, २६ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## बीएमसी महापौर निवडणूक ३१ जानेवारीला

### पदासाठी इच्छुक उमेदवारांनी २८ जानेवारीपर्यंत अर्ज भरण्याची मुदत

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईच्या महापौर पदासाठी इच्छुक उमेदवारांनी २८ जानेवारीपर्यंत आपले अर्ज पालिकेच्या चिटणीस विभागाकडे दाखल करायचे आहेत. तर ३१ जानेवारीला महापौर व उपमहापौराची निवड होणार आहे. यंदा मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी हे पीठासीन अधिकारी असणार आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली महापौर पदासाठी आणि त्यानंतर नवनिर्वाचित महापौर यांच्या अध्यक्षतेखाली उप महापौर पदासाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीबाबतचा अजेंडा शनिवारी पक्षनिहाय, अपक्ष अशा प्रत्येक विजयी उमेदवाराच्या म्हणजेच २२७ विजयी उमेदवारांना घरपोच करण्यात येणार आहे. सर्वात जास्त संख्याबळ असलेल्या राजकीय पक्षाकडून जेव्हा २८ जानेवारी रोजी महापौर, उप महापौर पदासाठी अर्ज भरायचे असतील. त्याबाबत सर्वच विजयी उमेदवारांना अगोदरच माहिती मिळणार आहे. त्यामुळे इतर पक्षांचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवार महापौर आणि उप महापौर पदाच्या निवडणुकीसाठी आपले अर्ज दाखल करू शकणार आहेत.

मुंबई महापालिकेच्या इतिहासात गेल्या २५ वर्षात तरी प्रथमच आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महापौर पदाची निवडणूक होणार आहे. वास्तविक, महापालिकेच्या एकूण पाच वर्षांच्या कालावधीत अडीच वर्षांनी महापौर पदासाठी निवडणूक घेण्यात येते. त्यावेळी मावळत्या महापौरांच्या अध्यक्षतेखाली नवीन महापौर पदासाठी निवडणूक




घेण्यात येत होती. मात्र ७ मार्च २०२२ रोजी महापालिकेची पाच वर्षांची मुदत संपुष्टात आल्यानंतर काही कारणास्तव जवळजवळ सलग चार वर्षे महापालिकेची निवडणूक झाली नाही. ती निवडणूक न्यायलाच्या आदेशानंतर १५ जानेवारी रोजी पार पडली. तसेच, १६ जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित झाला. मात्र आता नवीन महापौरांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांमधून ज्येष्ठ नगरसेवकांना पीठासन अधिकारी म्हणून नेमले जाते आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली महापौर पदाची निवडणूक घेण्यात विजयी येते, अशी कार्यपद्धती होती. मात्र नवीन निवडणुकीसाठी चार वर्षांचा कालावधी गेला असून पीठासन अधिकारी म्हणून विरोधी पक्षातील (शिवसेना ठाकरे) ज्येष्ठ नगरसेवकांना अधिकार दिल्यास त्यास सत्तेवर येणारे भाजप पक्षाकडून विरोध होणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच कदाचित प्रधान सचिव दर्जाचे सनदी अधिकारी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली यंदाची महापौर निवडणूक पार पडणार आहे. तसा सुधारित अध्यादेश काढ्यात आल्याचे सांगण्यात येते.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी पार पडल्या. १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर झाले. त्यामुळे साहजिकच आता महापौर आणि उप महापौर पदासाठी निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्याची प्रक्रिया सर्व महापालिकांत सुरू झाली आहे. त्यानुसार, ३१ जानेवारी रोजी नवीन महापौर पदासाठी मुंबई महापालिकेच्या मुख्य सभागृहात दुपारी १२ वाजता निवडणूक घेण्याचे नियोजन आहे. पीठासन अधिकारी आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली महापौर पदासाठी निवडणूक पार पडल्यावर नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक घेतील. त्यानंतर, महापौरांकडे या निवडणुकीत ज्या ज्या पक्षाचे उमेदवार विजयी झाले, त्यांची संख्या याची यादी महापालिका चिटणीस यांच्याकडून सादर होईल आणि ती सभागृहाच्या पटलावर मांडण्यात येईल. त्यामुळे या निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार अधिकृतपणे नगरसेवक झाल्याबाबत शिक्कामोर्तब होणार आहे.

**इन कॅमेरा प्रक्रिया होणार**

महापौर पदासाठी महापालिका आयुक्त हे पीठासीन अधिकारी असणार आहेत. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ही महापालिका चिटणीस विभागामार्फत इन कॅमेरा होणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राहणार आहे.

**चर्चेतील कुठला नगरसेवक ठरणार सरस?**

मुंबईचा महापौर हा महायुतीचा होणार हे आता स्पष्ट झाल्याने मोठा पक्ष असलेला भाजप आपल्या कोणत्या नगरसेविकेला महापौरपदी विराजमान करतात याकरता माध्यमांमध्ये जोरदार स्पर्धा दिसून येत आहे. या पदासाठी भाजपच्या अनेक महिला नगरसेवकांची नावे चर्चेत आहेत. यामध्ये भाजपमध्ये निवडणुकीपूर्वी आलेल्या काही नगरसेवकांची नावेही माध्यमांद्वारे चर्चेत आहेत. त्यामुळे या महापौर पदी मूळ भाजपचा नगरसेवक बसवला जाणार की बाहेरून आलेल्यांपैकी कुणा नगरसेविकेला या पदावर बसवणार याची उत्सुकताच मुंबईकरांना लागली आहे. मात्र, बाहेरुन आलेल्या नगरसेवकाला महापौर पदी बसवण्याची चर्चा माध्यमांमध्ये सुरु असली तरी भाजप हे पाऊल उचललेल काय याबाबतच जनतेच्या मनात शंका कुशंका निर्माण होवू लागल्या आहेत. त्यामुळे चर्चेत असणाऱ्यांपैंकी कोणती नगरसेविका कॉम्बिनेशनमध्ये सरस ठरते आणि आपल्या गळ्यात महापौरपदाची माळ घालून घेते हे आता पहावे लागेल. मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर बसणार आणि यासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्ग आरक्षित झाल्यानंतर भाजपच्या दोनपासून ते अनेक वेळा निवडून आलेल्या नगरसेविकांची नावे माध्यमांद्वारे चर्चिला जात आहेत. यामध्ये रितू तावडे, राजेश्री शिरवडकर,अलका केरकर, शितल गंभीर, स्वप्ना म्हात्रे, प्रिती सातम, योगिता कोळी, श्रीकला पिल्ले, तेजस्वी घोसाळकर, राखी जाधव, अश्विनी मते आदींची नावे चर्चेत आहेत. भाजपच्या निवडून आलेल्या महिला नगरसेविकांमध्ये अमराठी नगरसेविकांचा समावेश आहे, परंतु मुंबईचा महापौर हा मराठी हिंदूच असेल असे स्पष्ट सांगितल्याने अमराठ नावे ही मागे पडली आहेत. परंतु, तेजस्वी घोसाळकर, राखी जाधव, अश्विनी मते यांनी विधानसभा तसेच महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेला आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी पक्षात आलेल्या या नगरसेविकांना महापौरपदी बसवण्याचा विचार पक्ष करणार का असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होत आहे. माध्यमांकडून या तिन्ही नावांची चर्चा सुरु आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे नवीन आलेल्या नगरसेवकाचा विचार केला जाणार नसला तरी जर त्या निवडून आलेल्या नगरसेवकामध्ये क्षमता असेल तर पक्ष त्यांचा जरुर विचार करू शकतो,असेही बोलले जात आहे. त्यामुळे जनतेसोबतच भाजपमध्येही अस्वस्थता पसरली आहे. त्यामळे इतर पक्षातून आलेल्यांचा विचार जर पक्षाने केल्यास मूळ भाजपमधील नगरसेवकांवर अन्याय ठरेल अशाप्रकारची भावना जनतेसोबतच कार्यकर्तेही खासगीत व्यक्त करताना दिसत आहेत. सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून भाजपचा स्वतःच्या बळावर महापौरपदी बसणारा पहिला महापौर असल्याने यापदावर पक्ष आता विविध कंगोऱ्यांनी विचार करून पुढील अडीच वर्षांमध्ये विरोधी पक्षाला जशास तसे उत्तर देण्याऐवजी सर्वांना सोबत घेवून जाणारा अशी महापौर देईल अशाप्रकारची माहिती मिळत आहे.

## मुंबईत दिंडोशी मनपा वसाहतीत दूषित आणि पिवळसर पाण्याचा पुरवठा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिकेच्या 'पी पूर्व' विभागांतर्गत येणाऱ्या गोरेगाव (पूर्व) येथील दिंडोशी मनपा वसाहत परिसरात गेल्या काही दिवसांपासून अत्यंत दूषित आणि पिवळसर रंगाचा पाणीपुरवठा होत आहे. यामुळे स्थानिक रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून, नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**पिण्याच्या पाण्यात गटाराचे पाणी ?**

दिंडोशी मनपा वसाहतीतील रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार,



सकाळी नळाला येणारे पाणी अत्यंत गढूळ आणि पिवळसर रंगाचे असते. पाण्याला उग्र वास येत असून, हे पाणी पिण्यासाठी तर सोडाच, पण दैनंदिन वापरासाठीही अयोग्य असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. जलवाहिनीमध्ये गटाराचे पाणी मिसळले जात असल्याची शक्यता स्थानिकांनी वर्तवली आहे.

**प्रशासनाकडे मागणी**

'पी पूर्व' विभाग कार्यालयाने तातडीने जलवाहिन्यांची तपासणी करावी, गळती दुरुस्त करावी आणि परिसरात शुद्ध पाण्याचा पुरवठा करावा, अशी आग्रही मागणी दिंडोशी मनपा वसाहतीतील नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने त्वरित पावले न उचलल्यास मनपा कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही साद प्रतिसाद मृणाल कट्ट्याच्या वतीने दिला आहे.

**नागरिकांमध्ये भीती आणि संताप**

दूषित पाण्यामुळे परिसरात काविळ, टायफॉइड आणि जुलाबासारखे जलजन्य आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. "आम्ही नियमित पाणीपट्टी भरतो, तरीही आम्हाला विषारी पाणी का?" असा संतप्त सवाल येथील गृहिणी आणि नागरिक विचारत आहेत.

## पालघर नगर परिषदेचा निष्काळजी आणि बेजबाबदारपणा

**■पालघर। प्रतिनिधी,**

नगर परिषदेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभारामुळे एका माजी सैनिकाला न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागल्याची बाब समोर आली आहे. घरपट्टी माफी, मालमत्ता नोंदीतील घोळ आणि प्रशासकीय दिरंगाई यांविरोधात माजी सैनिक डॉ. भाऊराव पुंडलिक तायडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

डॉ. तायडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी सन २०१० ते २०२५ या १५ वर्षांच्या काळात घरपट्टी माफीसाठी नगरपरिषदेकडे अनेकदा अर्ज केले. मात्र, प्रशासनाकडून त्यांना एकदाही लेखी उत्तर देण्यात आले नाही. विशेष म्हणजे, या काळात त्यांना एकदाही प्रॉपर्टी टॅक्सचे मागणीपत्र देण्यात आले नाही, त्यामुळे




"कर भरायचा तरी कसा?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

डॉ. तायडे यांनी घरपट्टी माफीचा अर्ज केल्यानंतर, त्यांचा जुना प्रॉपर्टी क्रमांक (४०२९) नगरपरिषदेच्या दफ्तरातून आणि संगणक प्रणालीतून अचानक गायब झाला आहे. प्रशासकीय दप्तरातील अधिकृत नोंद गायब होणे, हा अत्यंत गंभीर प्रकार असून यामुळे प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नगरपरिषदेच्या संगणक प्रणालीत डॉ. तायडे यांच्या नावे 'घोलविरा' परिसरात दोन मालमत्तांची चुकीची नोंद करण्यात आली आहे. प्रत्यक्षात त्या मालमत्ता त्यांच्या ताब्यात नाहीत. अधिकृत कागदपत्रांवर नाव दाखवून त्यांना कायदेशीर अडचणीत आणले जात असल्याचा आरोप तायडे यांनी केला आहे. "जर त्या मालमत्ता माझ्या नावावर आहेत, तर त्या प्रत्यक्ष माझ्या ताब्यात द्याव्यात," अशी मागणी त्यांनी केली आहे.

देशासाठी सेवा बजावलेल्या माजी सैनिकाला स्वतःच्या हक्काच्या कामासाठी १५ वर्षे पायपीट करावी लागणे आणि अखेर उपोषणास बसावे लागणे, याबद्दल पालघरमधील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आता जिल्हा प्रशासन आणि नगर परिषद यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बांगलादेशी महिलेची तुरुंगात रवानगी

### बनावट कागदपत्रांचा वापर करून भारतात वास्तव्य

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील विशेष न्यायालयाने एका बांगलादेशी महिलेला सात महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. तिने भारतात बेकायदेशीरपणे प्रवेश करून बनावट कागदपत्रांचा वापर करून भारतीय ओळखपत्र मिळवले होते. याबद्दल तिला दोषी ठरवत न्यायालयाने तिला ३ हजार १०० रुपयांचा दंडही ठोठावला आहे. दोषी महिलेची ओळख नागी रोहिमा मोनू शेख ऊर्फ रत्ना (३२) अशी झाली आहे.

मुंबई गुन्हे शाखेने सादर केलेल्या तपास आणि ठोस पुराव्यांमुळे ही कारवाई करणे शक्य झाले आहे. गुन्हे शाखेचे उपायुक्त राज तिलक रोशन यांनी दिलेल्या माहितीनुसार २९ जून २०२५ रोजी युनिट-२ टीमला रत्ना नावाची एक महिलेचा ठावठिकाणा लागली. ही महिला कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांशिवाय मुंबईत राहत असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे, गुन्हे शाखेच्या टीमने महिलेला



ताब्यात घेऊन चौकशी केली. तपासात आढळले की, ही महिला मूळची बांगलादेशी नागरिक होती. तिने पासपोर्ट, व्हिसा किंवा इतर कोणत्याही वैध परवानगीशिवाय सीमा ओलांडून बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केला होता. शिवाय ओळख लपवण्यासाठी आणि भारतीय नागरिक असल्याचे भासवण्यासाठी तिने बनावट कागदपत्रांचा वापर केला आणि बनावट आधार कार्ड मिळवले होते.

मुंबईत डीबी मार्ग पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हे शाखेचे निरीक्षक प्रशांत गावडे यांनी सविस्तर तपास केला. तपासादरम्यान, आरोपींकडून जप्त केलेले बनावट भारतीय कागदपत्रे न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात आली, ज्यामुळे महिलेने वैयक्तिक फायद्यासाठी तिच्या भारतीय ओळखीचा गैरवापर केल्याचे सिद्ध झाले.

खटल्यादरम्यान, सरकारी वकिलांनी असा युक्तिवाद केला की, आरोपीने केवळ सीमा सुरक्षा नियमांचे उल्लंघन केले नाही तर बनावट कागदपत्रांद्वारे सरकारी यंत्रणेची दिशाभूल केली. सर्व पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांवर आधारित, न्यायालयाने महिलेला घुसखोरी आणि फसवणुकीबद्दल दोषी ठरवले. निकाल देताना, न्यायालयाने म्हटले आहे की, भारतात बेकायदेशीरपणे राहणे आणि परदेशी नागरिकांसाठी ओळख निर्माण करण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करणे हा एक गंभीर सुरक्षा गुन्हा आहे. तिची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर, महिलेची तिच्या देशात रवानगी केली जाईल.

## घनकचरा व्यवस्थापनाच्या वाहनांची जीपीएस सुविधा ठप्प

महापालिकेने या जीपीएस प्रणालीसाठी एका युनिटमागे उपकरण व देखभाल दुरुस्ती खर्च धरून सुमारे 9 हजार 322 रुपये इतका खर्च केला होता. या प्रमाणे एकूण सुमारे 13 लाख रुपयांचा खर्च करण्यात आला. मात्र हि प्रणाली प्रत्यक्षात किती काळ कार्यरत होती, याबाबत पालिकेकडे कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार मागील सात वर्षांपासून ही सुविधा पूर्णतः बंद आहे.




**■वसई। प्रतिनिधी,**

वसई विरार महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने सन २०१८ मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला होता. त्यांतर्गत घनकचरा संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या १४९ वाहनांमध्ये जीपीएस प्रणाली बसविण्यात आली होती. या प्रणालीच्या माध्यमातून कचरा संकलन, वाहतूक, वाहनांची हालचाल तसेच कचरा डब्ब्यांचे व्यवस्थापन यावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र अवघ्या वर्षभरातच संबंधित ठेकेदाराचा करार संपुष्टात आल्याने ही संपूर्ण प्रणाली बंद पडली. परिणामी गेल्या तब्बल सात वर्षांपासून ही जीपीएस सुविधा वापरात नसून ती अक्षरशः धूळ खात पडली आहे.

दरम्यान, मार्च २०२२ मध्ये कचरा व्यवस्थापन अधिक पारदर्शक व शिस्तबद्ध करण्यासाठी आधुनिक बरकोड प्रणाली लागू करण्याचा निर्णय महापालिकेने जाहीर केला होता. या प्रणालीद्वारे कचरा उचल, वर्गीकरण आणि नियोजन प्रक्रियेत तंत्रज्ञानाच्या मदतीने सुसूत्रता आणली जाईल, असे सांगण्यात आले होते. मात्र अजूनपर्यंत या योजनेचा मसुदाही तयार झालेला नाही.

वसई विरारमधील अनेक भागात नियमित कचरा उचल होत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्याचबरोबर काही ठिकाणी पालिकेच्या कचरा संकलन ठेकेदारमार्फत आडोशाला काचऱ्याच्या गाड्या खाली केल्या जात असल्याचे आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

## पतीसोबत वाद झाल्याने घर सोडलं, पण दलालांनी रेड लाईट एरियात विकलं

**■बदलापुर। प्रतिनिधी,**




नवऱ्यासोबत भांडण होऊन एक महिला रागात घराबाहेर पडली. मात्र ती घरी न आल्याने नवऱ्याने पोलिसांत तक्रार दाखल केली. यानंतर काही महिने गेले आणि बिहारची ही महिला सापडली पश्चिम बंगालमधील एका रेड लाईट एरियामध्ये. एखाद्या थरारक चित्रपटासारखी वाटावी अशी ही घटना. बिहारच्या पटनामधील मनेर भागात राहणारी ही महिला आहे. एक दिवस नवऱ्यासोबत भांडण झाल्याने ती घराबाहेर पडली. यानंतर पुढं काय घडलं ते जाणून घेऊया.

**महिलेला रेड लाईट एरियात विकलं**

नवऱ्यासोबत भांडण होऊन घराबाहेर पडणारी ही महिला काही दलालांच्या तावडीत सापडली. तिला पश्चिम बंगालमध्ये नोकरी देण्याचं खोटं आश्वासन दलालांनी दिलं. मात्र बंगालमध्ये नेऊन तिला एका रेड लाईट एरियात २५ हजारांना विकण्यात आलं. याठिकाणी काही महिने गेल्यानंतर एका ग्राहकाने तिला मदत केली आणि तिच्या नवऱ्यापर्यंत तिचा ठावठिकाणा पोहोचवला.

**पोलिसांची छापेमारी**

नवऱ्याला सूचना मिळताच ही माहिती त्याने मनेर पोलिस स्टेशनमध्ये दिली. यानंतर मनेर पोलिसांनी बंगाल पोलिसांशी संपर्क साधला आणि त्यांच्या मदतीने संबंधित रेड लाईट एरियावर छापा मारला. संबंधित महिलेला सुखरुपपणे नवऱ्याच्या स्वाधीन करण्यात आले आणि वेश्यागृहाच्या संचालकाला अटक करण्यात आली.

**महिलेने सांगितली हकिकत**

मनेर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर महिन्यात ही महिला गायब झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. ही महिला पश्चिम बंगालमध्ये असल्याची सूचना मिळाल्यावर तात्काळ कारवाई करण्यात आली. सूचना देणारा ग्राहक आणि पश्चिम बंगाल पोलिसांच्या मदतीने छापेमारी करुन महिलेला ताब्यात घेण्यात आलं. सोबतच वेश्यागृहाच्या संचालकालाही अटक करण्यात आलं आहे. महिलेने सांगितले की, 'नवऱ्यासोबत तिचं भांडण झालं होतं. यानंतर एका तरुणाने तिला नोकरीचं अमिष दाखवून पश्चिम बंगालच्या रेड लाईट एरियात विकले.' दरम्यान, तिला सुखरुपपणे कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## वसतीगृहात राहणाऱ्या मैत्रिणीचे कपडे बदलतानाचे व्हिडीओ गुपचूप शूट केले, अन्...

**■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,**

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको भागातील एका नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसतिगृहात अतिशय धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सोबत राहणाऱ्या मैत्रिणीनेच एका तरुणीचे कपडे बदलतानाचे व्हिडिओ चोरून चित्रित करून ते आपल्या प्रियकराला पाठवल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून सिडको पोलीस ठाण्यात संबंधित तरुणी आणि तिचा प्रियकर स्वराज धालगडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**"फोटो कसे वाटले?", तरुणीची बॉयफ्रेंडला विचारणा, अन् सगळं प्रकरण उघडकीस**

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी तरुणी या दोघीही अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत असून गेल्या तीन वर्षांपासून एकाच वसतिगृहात राहत होत्या. १९ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास आरोपी तरुणी आपल्या प्रियकराशी फोनवर संशयास्पद संभाषण करत असल्याचे पीडितेच्या लक्षात आले. फोनवर बोलताना ह्लफोटो आणि व्हिडिओ कसे वाटले? हॉट आहेत का?ह्व असे शब्द वापरत असल्याचे ऐकून पीडितेचा संशय बळावला. त्यानंतर पीडितेने आरोपी तरुणीला रंगेहाथ पकडत तिचा मोबाइल ताब्यात घेतला. पासवर्ड विचारून मोबाइल तपासला असता कपडे बदलतानाचे आपलेच व्हिडिओ आरोपी तरुणीने चोरून काढून ते तिच्या प्रियकराला पाठवल्याचे उघड झाले. या प्रकारामुळे मानसिक धक्का बसलेल्या पीडित तरुणीने तात्काळ सिडको पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी संबंधित तरुणी आणि तिचा प्रियकर यांच्याविरोधात आयटी ॲक्टसह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.





## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# व्यवस्थेवर उपाय कधी?




महाराष्ट्रात सध्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’चा लाभ खरोखरच लाभार्थीनाच मिळत आहे ना, याची ‘ई-केवायसी’ (ऑनलाईनद्वारे स्वतःची ओळख कागदपत्रांद्वारे पडताळून देणे) करून पडताळणी करण्याचे काम चालू आहे. खोटी माहिती देऊन पात्र नसलेल्या लाखो महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले. काही शासकीय महिला कर्मचारी आणि पुरुष यांनीही खोटी माहिती देऊन या योजनेचा अपलाभ घेतला. त्यामुळे सरकारला कोट्यवधी रुपयांची आर्थिक हानी झाली. यातून धडा घेऊन डिसेंबर २०२५चा हप्ता ‘ई-केवायसी’नंतरच देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ‘ज्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा अपलाभ घेतला, त्यांच्यावर गुन्हा नोंद करून पैसे वसूल केले जातील’, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. प्रत्यक्षात कोणती कारवाई झाली, हे अद्याप पुढे आलेले नाही. १२ सहस्र ९०० शासकीय महिला कर्मचार्यांनी या योजनेचा अपलाभ घेतला होता आणि ८६ लाख अपात्र नावे या योजनेतून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे सरकारला १५० कोटी रुपयांहून अधिक भुर्दंड बसला. त्यामुळेच या लाभार्थीची ‘ई-केवायसी’ चालू आहे. तांत्रिक त्रुटी वा अज्ञान यांमुळे शासकीय योजनेचा अपलाभ हा काही प्रमाणात होऊ शकतो, हे समजून घेण्यासारखे आहे; परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात जेव्हा योजनेचा अपलाभ होतो, तेव्हा तो ठरवून केलेला भ्रष्टाचार असतो. शासकीय योजनेतील हा भ्रष्टाचार केवळ फसवर्णायाने खोटी माहिती दिली, यावरून होत नाही, तर प्रशासकीय पातळीवर लाच घेऊन अशा चुकीच्या गोष्टी चालवून घेतल्या जातात, तेव्हाच असे प्रकार होतात. हा भ्रष्टाचार केवळ ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’पुरता मर्यादित नाही, तर अशा प्रकारे बहुतांश शासकीय योजनेचा अपलाभ होऊन सरकारला जो कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड बसतो, याचा हिशोब लावणे कठीण होईल. वर्ष २०१७-१८ च्या कालावधीमध्ये महाराष्ट्रात खोट्या क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात भरती झाल्याचा प्रकार उघड झाला. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना सरकारी नोकरीमध्ये ५ टक्के आरक्षण दिले जाते. याचा अपलाभ घेऊन काही क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पैसे घेऊन खोट्या कागदपत्रांच्या आधारे क्रीडा प्रमाणपत्रे दिली. याविषयीच्या तक्रारी आल्यावर हळूहळू सरकारच्या हा घोटाळा लक्षात आला; परंतु तोपर्यंत सरकारच्या १८ हून अधिक विभागांमध्ये हे उमेदवार कार्यरतही झाले होते. अशा प्रकारे खोट्या क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी प्राप्त केलेल्यांच्या विरोधात सध्या ‘महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणा’मध्ये खटले चालू आहेत, म्हणजे खोट्या कागदपत्रांच्या आधारे भरती झाली, हा एक घोटाळा आणि तो निस्तरण्यासाठी न्यायालयीन प्रक्रियेत होणारा व्यय अन् या प्रकरणांच्या सुनावण्यांसाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सातत्याने उपस्थित रहावे लागणे, अशा विविध प्रकारे सरकारलाच फटका बसत आहे. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ असो किंवा खोट्या क्रीडा प्रमाणपत्रांचा घोटाळा असो, हे दोन्ही प्रशासनाकरता लाजिरवाणे आहेत. खासगी आस्थापनात असे प्रकार घडले असते, तर ते करणाऱ्यांना हाकलून लावण्यात येईल. सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून होणारा भ्रष्टाचार हा सरकारची अकार्यक्षमता आणि अनास्था न्यून करणारी आहेच; परंतु सर्वसामान्य नागरिकांसाठीही डोकेदुखी आहे. महाराष्ट्रात मागील २ वर्षांत जे १ सहस्र २३७ बांगलादेशी घुसखोर सापडले, त्यांच्याकडे जन्मप्रमाणपत्र, आधारकार्ड, शिधापत्रिका, वाहन परवाना, पॅनकार्ड ही कागदपत्रे मोठ्या प्रमाणात आढळून आली. शासकीय स्तरावरील भ्रष्टाचार आणि अनास्था यांविना हे शक्यच नाही. वर्ष २०१३ मध्ये तर अमरावती येथे भारतीय क्रिकेट संघाचे तत्कालीन कप्तान महेंद्रसिंह धोनी, गुजरातचे त्या वेळचे मुख्यमंत्री आणि आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाच्या शिधापत्रिका बनवण्यात आल्या होत्या. हा प्रकार तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी सरकारला पाठवलेल्या अहवालातून उघड झाला होता. सरकारकडून बांगलादेशी घुसखोरांचा शोध तर चालू आहे; परंतु त्यांना खोटी प्रमाणपत्रे देण्यामध्ये प्रशासनातील कोणते अधिकारी आणि कर्मचारी यांचा हात आहे, याचाही शोध सरकारने घ्यायला हवा. खोटी क्रीडा प्रमाणपत्रे किंवा ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ यांतील अपहार हा सरकारच्या आर्थिक हानीपुरता मर्यादित होता; मात्र बांगलादेशी घुसखोरांना खोटी प्रमाणपत्रे देण्याचा प्रकार भ्रष्टाचार, आर्थिक हानी यांसह राष्ट्रविरोधी आहे, याचा अन्वेषण यंत्रणा आणि सरकार यांनी गांभीयार्ने विचार करायला हवा. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी चालू असल्याचे प्रकार उघड झाल्यानंतरही काही रकमेसाठी त्यांना खोटी कागदपत्रे देणारे देशद्रोही राज्यासह देशाशी निष्ठा ठेवू शकत नाहीत. बांगलादेशी घुसखोरांनी भलेही खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रे बनवली आहेत, तरीही राष्ट्रापुढील धोका लक्षात घेऊन प्रशासनातील उच्च अधिकारी आणि प्रमाणपत्र देणाऱ्या कार्यालयाशी संबंधित अधिकारी यांनी सतर्कपणे त्यांची पडताळणी करणे आवश्यक होते. महाराष्ट्रात सहस्रो बांगलादेशी घुसखोर सापडणे, हा प्रशासन, पोलीस आणि सरकार यांसाठी मोठी नाचक्कीच आहे. सरकारी कर्मचारी खासगी क्षेत्राच्या तुलनेत चांगले वेतन घेतात; मात्र त्या तुलनेत नागरिकांना चांगली सुविधा देण्याचे आणि काम प्रामाणिकपणे करण्याचे दायित्व पार पाडत नसतील, तर असे कर्मचारी अन् अधिकारी पांढरा हत्ती पोसण्यासारखे आहे, असे म्हणायला मुळीच हरकत नाही. प्रशासकीय व्यवस्थेतील सर्वच अधिकारी आणि कर्मचारी भ्रष्ट अन् अकार्यक्षम आहेत, असे नाही; परंतु या कामकाजाच्या साखळीत काही जण असे असले, तरी त्याचा परिणाम व्यवस्थेवर होतो. सरकारच्या एकूण व्ययातील ४० टक्क्यांहून अधिक व्यय हा सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होतो. अशा वर्गाकडून कामकाजामध्ये भ्रष्टाचार होणे, हे निश्चितच दुर्लक्षित करण्यासारखे नाही. सरकार आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनी याविषयी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. काही मासांपूर्वी महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने प्रत्येक शासकीय विभागांच्या कार्यालयांसाठी १०० दिवसांचे कामकाज निश्चित केले. हा उपक्रम यशस्वी झाल्यावर याचा कालावधी वाढवण्यात आला आहे. प्रशासनाला कार्यक्षम करण्याच्या दिशेने हे एक चांगले पाऊल ठरले आहे. याच प्रकारे प्रशासनातील भ्रष्टाचार न्यून करण्यासाठी आणि प्रामाणिकपणा वृद्धींगत होण्यासाठीही अधिकारी अन् कर्मचारी यांना नैतिकतेचे शिक्षण देणेही आवश्यक ठरेल!



# भारताची राज्यघटना कशी तयार करण्यात आली?

भारत १५ ऑगस्ट १४७ला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला आणि २६ जानेवारी १९५० आपली राज्यघटना अंमलात आली. म्हणजेच भारत देश प्रजासत्ताक झाला. याच राज्यघटनेनुसार आ-जही आपलं सरकार, आपली राज्यव्यवस्था आणि एकूणच राज्यकारभार चालतो. मग प्रश्न पडतो की १५ ऑगस्ट १९४७ पासून २६ जानेवारी १९५० पर्यंत देश कसा चालत होता? तब्बल दोन वर्ष, ५ महिने आणि ११ दिवस भारताची काय परिस्थिती होती? आपल्यापैकी बहुतांश लोकांचा तर त्या काळी जन्मही झाला नव्हता. मग चला तर पाहूया की त्या दिवसांमध्ये काय काय घडलं होतं? या अशा घटना होत्या ज्यांचा आजही आपल्या आयुष्यावर परिणाम होतोय.

### स्वातंत्र्य मिळालं, पण?

देश स्वतंत्र झाला असला, तरी देश चालवण्यासाठी घटना अजून तयार नव्हती. ९ डिसेंबर १९४६ पासून घटना समितीच्या बैठका सुरू झाल्या होत्या. १४१ दिवसांच्या परिश्रमानंतर घटना समितीने पहिला मसुदा तयार केला. तो दिवस होता ३ नोव्हेंबर १९४७. पण हा काही अंतिम मसुदा नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पुढच्या अडीच वर्षांत घटना समितीची एकूण १२ सत्रं पार पडली. घटनेतील प्रत्येक शब्द तोलून-मापून आणि सर्व विचाराअंती लिहिण्यात आला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली, म्हणून तो दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आणि २६ जानेवारी १९५०ला ती देशात अंमलात आणली गेली, तेव्हापासून आपण आजपर्यंत आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून ओळखले जातो. ज्या देशात घटनात्मक प्रमुखाची नियुक्ती निवडणुकीत होते, तो देश प्रजासत्ताक असतो. जो देश स्वतःच स्वतःला चालवतो आणि बाहेरच्या शक्तींवर अवलंबून नसतो, त्याला सार्वभौम म्हणतात. ब्रिटनमध्ये लोकशाही आ-हे, पण ते प्रजासत्ताक नाही, कारण त्या देशाची घटनात्मक प्रमुख ही राणी आहे.

### राष्ट्रपती आणि पंतप्रधान

१५ ऑगस्ट १९४७च्या मध्यरात्री दिलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की ‘‘नियतीशी आम्ही करार केला होता. त्या करारानुसारच आजची स्वातंत्र्याची पहाट आम्हाला पाहायला मिळाली आहे.’’ ब्रिटिशांनी जाता-जाता सर्वपक्षीय सरकारकडे सत्ता सुपूर्द केली होती. काँग्रेसचे पंडित नेहरू हे या सरकारचे नेते होते, पण त्यांच्या कॅबिनेटमध्ये वेगवेगळ्या विचारसरणीचे, पक्षांचे आणि सामाजिक पार्श्वभूमीचे नेते होते. त्यांच्या समन्वयाने देशाचा कारभार पहिले साधारण अडीच वर्ष चालला. नंतर अर्थातच १९५१ साली पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांचे बिगुल वाजले आणि विविध पक्षांमधले मतभेद, त्यांच्यातला विरोध स्पष्ट झाला. इंग्रज गेले तरी भारताचे शेवटचे व्हॉइसरॉय लॉर्ड माउंटबॅटन स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून इथेच थांबले. जवाहरलाल नेहरू पहिले पंतप्रधान बनले. नंतर २१ जानेवारी १९४८ रोजी सी. राजगोपालचारी म्हणजेच राजाजी हे स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल झाले. पण १९५०मध्ये राज्यघटना तयार झाल्यावर गव्हर्नर जनरल हे पदच रद्द करण्यात आलं आणि त्यानंतर राष्ट्रपती हे देशाचे घटनात्मक प्रमुख असतील, असं जाहीर करण्यात आलं. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची देशाचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड करण्यात आली.

### संस्थानांचं विलिनीकरण

पण त्याचबरोबर दरम्यान आणखी एक आव्हान होतं. पाकिस्तानमधून येणाऱ्या निर्वासितांचं पुनर्वसन करणं जवळजवळ साडेपाचशे स्वायत्त संस्थानांना भारतात सामील करून घेणं. यापैकी बहुतेक सर्व संस्थानांनी भारतात विलीन होण्याची तयारी दाखवली, पण हैदराबाद, जुनागढ आणि काश्मीरनं नकार दिला. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नांनंतर तिन्ही संस्थानं भारतात विलीन करून घेण्यात आली. हैदराबादच्या स्वातंत्र्यासाठी तर भारताला लष्कर पाठवावं लागलं होतं हा ज्ञात इतिहास आहे.

### आर्थिक सुधारणा

तत्कालीन आर्थिक परिस्थिती देखील बिकट होती. इतिहासकार बिपन चंद्रा त्यांच्या 'इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स'मध्ये सांगतात की इंग्रजांच्या २०० वर्षांच्या कारभारात भारताची अर्थव्यवस्था विदारक झाली होती. देशांत गरिबी होती, निरक्षरता होती, शेती अत्यंत वाईट परिस्थितीत होती. हे सर्वकाही सुस्थितीत आणण्याचं आव्हान स्वतंत्र भारताच्या शासकांपुढे होतं. उदाहरणार्थ, १९३८-३९ साली फक्त ११ टक्के शेतजमिनीवर चांगली बियाणं वापरात होती. स्वातंत्र्याच्या वेळी देशाच्या अर्थव्यवस्थेत एकूण कारखान्यांमधल्या उत्पादनांचं योगदान फक्त ७.५ टक्के होतं. आणि देशातली जवळजवळ ९०% यंत्रं आयात केलेली होती, असं बिपन चंद्र त्यांच्या पुस्तकात नमूद करतात. १९४७मध्ये आर्थिक कार्यक्रम समिती स्थापित करण्यात आली होती. पंडित नेहरू त्या समितीचे अध्यक्ष होते. भारताच्या आर्थिक प्रगतीची दिशा काय असावी, याचं धोरण या समितीनं ठरवलं होतं. भारतातील उद्योगधंद्यांपैकी ७५% उद्योग हे भारतीयांच्या मालकीचे होते. स्वतंत्र होण्याआधीपासूनच भारतीय उद्योजक युरोपियन व्यापाऱ्यांच्या स्पर्धेत होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर बिर्ला, टाटा, सिंघानिया, दालमिया, जैन यांचे उद्योग अधिक बळकट झाले आणि भारताच्या प्रगतीमध्ये मोठा वाटा उचलला. मार्च १९५० मध्ये नियोजन समितीची स्थापना झाली. १९५१ला पंचवार्षिक योजना सुरू झाली. त्याची पायाभरणी १९४७ ते १९५० या काळात झाली असं आपण म्हणू शकतो.

### भारतीय संविधानाची निर्मिती

भारतात अनेक जाती आणि धर्मांचे, वेगवेगळ्या संस्कृतीचे, वर्गाचे लोक एकत्र राहतात. भारतीय लोकशाहीमुळेच वेगवेगळ्या गटांना संसदेत प्रतिनिधित्व मिळालं आहे. भारतीय लोकशाही बळकट करण्याचं श्रेय हे भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेची निर्मितीच्या प्रक्रियेलाच द्यावं लागेल. भारतीय संविधान हे अनेक लोकांच्या परिश्रमातून, अभ्यासातून, आणि संशोधनातून निर्माण झालं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ड्राफ्टिंग कमिटीचे म्हणजेच घटनेच्या मसुदा समितीचे प्रमुख होते. भारतीय संविधानाचं स्वरूप कसं असावं, त्याची चौकट त्यांनी आखली, विविध विषयांवरील तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती, त्यांच्या सूचना ध्यानात घेऊन त्या राज्यघटनेत कशा येतील याचा विचार बाबासाहेबांनी केला. राज्यघटनेच्या निर्मितीत त्यांनी जो मोठा वाटा उचलला आहे त्यामुळे त्यांना राज्यघटनेचा शिल्पकार म्हटलं जातं. राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया ही प्रदीर्घ होती. ९ डिसेंबर १९४६ रोजी भारताची घटना समिती पहिल्यांदा एकत्र आली आणि त्यांनी भविष्यातल्या भारताची दिशा ठरवली. डॉ. आंबेडकरांची घटनेच्या मसुदा समितीवर नियुक्ती २८ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. १४१ दिवसांच्या परिश्रमानंतर घटना समितीने पहिला मसुदा तयार केला. तो दिवस होता ३ नोव्हेंबर १९४७. भारताच्या स्वातंत्र्यानंतर पुढील अडीच वर्षात संसदेत घटना समितीची एकूण १२ सत्रं पार पडली. घटनेतील प्रत्येक शब्द तोलून मापून आणि पूर्ण विचारांती लिहिण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीच्या सदस्यांची पहिली बैठक झाली होती. त्यानंतर २ वर्ष, ११ महिने आणि १८ दिवसांच्या परिश्रमानंतर २६ नोव्हेंबर रोजी राज्य घटनेचा मसुदा तयार झाला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० ला ती अंमलात आणली गेली. तेव्हापासून आजपर्यंत आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून ओळखले जातो.

# ‘अवकाशयोद्धा’ सुनीता विल्यम्स!



अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था असलेल्या ‘नासा’मधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स या त्यांच्या २७ वर्षांच्या सेवेनंतर अधिकृतपणे निवृत्त झाल्या. त्या निवृत्त झाल्या असल्या, तरी त्यांनी अंतराळ स्थानकामध्ये भविष्यातील अनेक मोहिमांची आखणी आधीच करून ठेवली आहे. याचा परिणाम भविष्यात आपल्याला पहायला मिळेलच! चंद्रावर जाण्याची ‘आर्टेमिस’ मोहीम आणि मंगळ ग्रहासाठीची मोहीम लवकरच सुनीता यांच्यामुळे कार्यान्वित होतील. त्यामुळे ही निवृत्ती नसून अवकाश संशोधनाचा पुनःप्रारंभ ठरेल. जिद्द, विज्ञाननिष्ठा, शिस्त आणि धैर्य यांचा समुच्चय असणाऱ्या सुनीता विल्यम्स या ‘नासा’ आणि ‘इस्रो’साठीही प्रेरणादायी आहेत. ‘इस्रो’चे प्रमुख श्रीधर सोमनाथ यांनीही सुनीता यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी त्यांचा अभिमान वाटत असल्याचे कौतुकोद्गार काढले होते. आगामी अंतराळविरांनी सुनीता यांचे कार्य आणि आयुष्य यांचा अभ्यास करायला हवा, तरच त्यांच्या कार्यरूपी तेजस्वी अध्यायाचे वारंवार स्मरण होत राहील.

सुनीता यांच्या आयुष्यात परिश्रम, सातत्य आणि कौशल्य ही त्रिसूत्री आढळून येते. अमेरिकेच्या नौदलात वैमानिक म्हणून त्यांनी त्यांच्या कारकीर्दीला प्रारंभ केला होता. त्यानंतर ‘नासा’च्या अंतराळवीर पथकात त्यांनी प्रवेश मिळवला. हा प्रवास रोमांचकारी आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी स्वतःची वेगळीच प्रतिमा निर्माण केली. त्यांच्या दीर्घ कारकीर्दीमध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्राच्या ३ मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करून त्यांनी अनेक विक्रम स्वतःच्या नावावर नोंदवले. त्यांना एकूण ६०८ दिवस अंतराळात रहावे लागले होते. त्यामुळे एका महिलेचा सर्वाधिक काळ अंतराळात वास्तव्याचा विक्रम त्यांच्याच नावावर नोंदवण्यात आला. त्यांनी एकूण ९ वेळा अंतराळात ‘स्पेसवॉक’ (अंतराळयानाच्या बाहेर अंतराळविराने केलेल्या शारीरिक हालचाली) केला. तो कालावधी ६२ घंटे ६ मिनिटे इतका गणला गेला. शून्य-गुरुत्वाकर्षणात वनस्पती लागवडीशी संबंधित वैज्ञानिक प्रयोग करणे, यंत्रणा दुरुस्त करणे आणि पृथ्वीवरील वैज्ञानिकांसमवेत समन्वय साधणे ही कामे त्यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. त्यांच्या या अजोड कामगिरीविषयी नासाचे नवे प्रशासक जेरेड इसाकमन यांनी त्यांना ‘अंतराळ उड्डाण क्षेत्रातील प्रणेत्या’ अशा शब्दांत गौरवले. त्या जरी ‘नासा’शी निगडीत असल्या, तरी भारतीय वंशाच्या असल्याने त्यांचे नाव ऐकताच प्रत्येक भारतियाची छाती अभिमानाने फुलून येते.

### घेई कवेत आकाश!

वर्ष २०२४ मध्ये सुनीता यांना बोईंगच्या कॅप्सूल चाचणीच्या उड्डाणाच्या वेळी अंतराळ स्थानकात पाठवण्यात आले होते. बोईंगच्या नवीन स्टारलाइनर कॅप्सूलवर उड्डाण करणार्या त्या पहिल्या अंतराळवीर होत्या. ते कार्य केवळ एका आठवड्याचे होते; परंतु स्टारलाइनरमधील समस्यांमुळे त्यांना अंतराळात ९ महिन्यांपेक्षा अधिक काळ थांबावे लागले; मात्र खचून न जाता त्यांनी ती परिस्थिती स्वीकारली. यानात अनेकदा तांत्रिक बिघाड होत होते. त्यांच्याकडे केवळ २७ दिवसांचे इंधन पुरेल, अशी स्थिती होती. ‘आपण पुन्हा सुखरूप कधी पोचू?’, याची शाश्वती नव्हती. दिवसागणिक अनिश्चितता वाढतच होती. अशा स्थितीत ना त्या घाबरल्या, ना निराश झाल्या. आशावादी रहाणाऱ्या सुनीता यांची स्थिरता आणि संयमी वृत्ती प्रत्येकालाच शिकण्यासारखी आहे. पृथ्वीवर पाऊल ठेवल्यावरही त्यांच्या चेहऱ्यावर हास्य होते, ही किती मोठी गोष्ट आहे! जरासा काही प्रतिकूल प्रसंग घडला, मनाविरुद्ध झाले की, तोंड पाडून बसणारी तरुण पिढी सुनीता यांच्या हास्यातून बोध घेईल का? ताजे, चविष्ट अन्न न मिळाल्यास विनाकारण त्रागा करणाऱ्यांनी, स्वतःच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास लगेच अस्वस्थ होणाऱ्यांनी, छोट्या-छोट्या प्रसंगांतून दुखावले जाणाऱ्यांनी सुनीता यांच्या उदाहरणातून धडा घ्यावा! सुनीता यांनी अंतराळ पालथे घातले. आयुष्यभर केवळ कुरबुरी करणार्यांनीही स्वतःच्या मनाच्या अंतराळाचा शोध घेऊन त्याला स्थैर्य आणण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

खरेतर अंतराळातील मोहिमा यशस्वी करणे, हे इतके साधेसोपे किंवा सरळ नाही. त्यामागे प्रत्येकाचेच कष्ट असतात. सामान्यांना अवकाशगमन म्हणजे एकदम थरारक अनुभव वाटतो; पण तो तितकाच जोखमीचाही आहे. त्यासाठी काटेकोर नियोजन आणि आखणी करावी लागते. पृथ्वीपासून सहस्रो किलोमीटर दूर असल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. असे असतांना स्वतःला सिद्ध ठेवणे म्हणजे कौशल्य पणाला लावावे लागते. अंतराळातील प्रत्येक कसोटीत सुनीता यशस्वी ठरल्या. कर्तव्याशी प्रामाणिक असल्यानेच त्यांना तेथील सर्व संकटांना धैयार्ने सामोरे जाता आले. हे सर्व त्यांनी स्वबळावर कसे साध्य केले? याचा आदर्श वस्तूपाठ सुनीता यांच्या उदाहरणातून सर्वांनाच घेता येईल. त्यांनी अंतराळात केलेल्या संघषार्मुळे त्या भावी अंतराळविरांसाठी मार्गदर्शक ठरल्या आहेत. भारतातील युवा पिढीला विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित, तसेच अंतराळ या क्षेत्रांत स्वतःला सिद्ध करण्याची प्रेरणा मिळाली. अवकाश संशोधन हे क्षेत्र पुरुषप्रधान मानले जायचे; पण कल्पना चावला आणि सुनीता विल्यम्स यांनी हा गैरसमज ठामपणे खोडून काढला. शारीरिक क्षमता, मानसिक सामर्थ्य आणि तांत्रिक कौशल्य यांमध्ये सरस ठरून महिला अंतराळवीरही तितक्याच सक्षम अन् उजव्या असतात, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. सुनीता विल्यम्स यांनी २७ वर्षांच्या कार्यकाळात जे मिळवले, ते खरेतर अंतराळविरासाठी स्वप्नवतच असेल; पण सुनीता यांच्या जिद्दीमुळे त्यांनी ते सत्यात उतरवून दाखवले.

### सुनीता यांचा मार्गदर्शक वारसा!

अंतराळ विज्ञानाइतकेच भारतीय संस्कृतीशी असलेले त्यांचे नातेही प्रेरणादायी आहे. मोहिमांच्या वेळी त्यांनी ‘भगवद्गीता’, उपनिषदे आणि ‘ॐ’ चिन्ह समवेत नेले होते. ‘भारत अंतराळातून कसा दिसतो?’ असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर सुनीता म्हणाल्या होत्या, ‘‘भारत हा एक महान देश आहे. तो दिव्यांचे जाळे पसरल्यासारखा दिसतो. भारतातील शहरे आणि समुद्र हे अद्भुत आहे.’’ अवकाशाची अथांग पोकळी गाठणाया सुनीता यांची नाळ भारतीय संस्कृतीशी जोडलेली आहे, हे यातून दिसून येते. ‘योग्य संधी, परिश्रम आणि चिकाटी असेल, तर कुणीही आकाशाला गवसणी घालू शकतो’, हा संदेश सुनीता यांच्या व्यक्तीमत्त्वातून अधोरेखित होतो. त्यांची निवृत्ती अंतराळविरांसाठी जरी भावनिक ठरणार असली, तरी त्यांनी निर्माण केलेला वारसा पुढील पिढ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे. आज अनेक तरुण-तरुणी अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात प्रवेश घेत आहेत. यामागे सुनीता विल्यम्स यांच्यासारख्यांचा मोलाचा वाटा आहे. अशा या सुनीता विल्यम्सरूपी अंतराळयोद्ध्याला सर्व भारतियांचा मानाचा मुजरा!

# तांदूळनिर्यातीला वेसण

भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलीकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ नियार्तीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे ‘डंपिंग’ करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

# प्रजासत्ताक दिन

## २६ जानेवारीलाच का साजरा केला जातो?




२६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू होऊन भारताला पूर्ण प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. यंदा देशभरात भारतीय संविधान लागू होऊन ७४ वर्षे पूर्ण होत आहेत. यंदा आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. २६ जानेवारी हा दिवस दरवर्षी देशात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू होऊन भारताला पूर्ण प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. यंदा देशभरात भारतीय संविधान लागू होऊन ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. यंदा आपण ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. आपल्याला प्रजासत्ताक मिळालं म्हणजे नक्की काय झालं? आणि हा दिवस २६ जानेवारीलाच का साजरा केला जातो? भारताचा नागरिक म्हणून हे माहीत असणे आवश्यक आहे. अशाच काही प्रश्नांची सविस्तर माहिती आपण जाणून घेऊया..

**हा दिवस २६ जानेवारीलाच का साजरा केला जातो?**

राज्यघटनेचा स्वीकार करण्यापूर्वी दोन वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस सार्वजनिक अधिवेशनांमध्ये विधानसभेची १६६ दिवस बैठक झाली. २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी दस्तावेजाच्या दोन हस्तलिखित प्रतींवर स्वाक्षरी केली. याच्या दोन दिवसांनंतर म्हणजे २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना देशभर लागू झाली. नवीन संविधानाच्या तरतुदींनुसार संविधान सभा भारताची संसद बनली. ही तारीख निवडण्यामागील कारण म्हणजे १९३० साली याच तारखेला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पूर्ण स्वातंत्र्याचा नारा दिला होता. १९२९ मध्ये रावी नदीच्या काठावर ३१ डिसेंबरला काँग्रेसचे अधिवेशन सुरू झाले. यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू अध्यक्षस्थानी होते. त्यांनी २६ जानेवारी १९३० रोजी अधिवेशनात तिरंगा फडकावला आणि पूर्ण स्वातंत्र्याचा नारा दिला. अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पूर्वी स्वराज्याचा प्रस्ताव मांडला होता. जर ब्रिटीश सरकारने भारताला २६ जानेवारी १९३० पर्यंत डोमोनियन पद (वर्चस्व) दिले नाही, तर भारत स्वतःला स्वतंत्र घोषित करेल, असे या प्रस्तावात मांडण्यात आले होते. प्रजासत्ताक दिन हा देशातील प्रत्येक नागरिकासाठी महत्त्वाचा दिवस आहे. याच दिवशी ब्रिटीश वासाहतवादी भारत सरकार कायदा (१९३५) बदलून भारतीय राज्यघटना औपचारिकपणे स्वीकारण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली नवीन राज्यघटनेचे नामनिर्देशन करण्यात आले, त्यामुळे त्यांना राज्यघटनेचे शिल्पकारही म्हणतात. या राज्यघटनेनुसार भारत लोकशाहीप्रधान देश बनला. याशिवाय आपल्या देशाच्या संविधानाला जगातील सर्वात मोठे संविधान मानले जाते. भारतीय राज्यघटनेत महत्त्वपूर्ण तत्त्वे असून, या तत्त्वाच्या आधारावर देशातील सरकार आणि नागरिकांसाठी अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, कायदे ठरवण्यात आले आहेत.

**प्रजासत्ताकदिनी तिरंगा कोण फडकवतं?**

देशाचे प्रथम नागरिक म्हणजेच राष्ट्रपतींच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी झेंडा फडकवण्यात येतो. तर राज्यांच्या राजधानीत राज्यपालांच्या हस्ते झेंडा फडकवण्यात येतो. राष्ट्रपती हे देशाचे सांविधानिक प्रमुख आहेत, त्यामुळे राष्ट्रपतींना हा अधिकार आहे. पहिल्या प्रजासत्ताकदिनी डॉ. राजेंद्र प्रसाद हे भारताचे राष्ट्रपती होते. राज्यघटना लागू झाल्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संसद भवनाच्या दरबार हॉलमध्ये राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली आणि त्यानंतर इर्विन स्टेडियममध्ये त्यांनी राष्ट्रध्वज फडकावला. राष्ट्रपती हे भारताच्या सशस्त्र दलांचे कमांडर इन चीफ असतात, त्यामुळे नवी दिल्लीतील संचलनात भारताचे राष्ट्रपती सलामी स्वीकारतात. संविधान लागू झाल्यानंतर देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिल्लीच्या जुन्या किल्ल्याजवळ इर्विन स्टेडियमवर पहिल्यांदा ध्वजसंचलन केले. त्यानंतर परेड झाली. यावेळी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि गव्हर्नर जनरल सी राजगोपालाचारीही उपस्थित होते. इंडोनेशियाचे राष्ट्रपती सुकर्णो यांना पहिल्या प्रजासत्ताक दिनाला पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते.

### राष्ट्रीय ध्वज कुणी तयार केला?

पिंगली वेंकया यांनी भारताचा राष्ट्रीय ध्वज तयार केला होता. सुरुवातीला पिंगली यांनी तयार केलेल्या ध्वजात लाल आणि हिरवा रंग होता. हा तयार केलेला ध्वज त्यांनी महात्मा गांधी यांच्यासमोर सादर केल्यानंतर गांधीजींच्या सूचनेनुसार यात पांढऱ्या रंगाची पट्टी जोडण्यात आली. यासह राष्ट्रीय प्रतीक म्हणून अशोक चक्रही यात जोडण्यात आले. हा ध्वज २२ जुलै १९४७ रोजी आयोजित घटनासभेच्या बैठकीत स्वीकारण्यात आला.

## औषध वेळेवर का घ्यावी? वाचा

सध्याच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या आजाराने त्रस्त आहे. या आजारांपासून दूर राहण्यासाठी विविध औषधं-गोळ्या घेतल्या जातात. आजार कोणताही असो पण वेळेवर औषधं घेणं फार महत्त्वाचे आहे. आपल्यापैकी बहुतांशजणांना हे सुद्धा माहिती नसते की, प्रत्येक दिवशी आपण कोणत्या ना कोणत्या कारणास्तव औषधं घेत असतो. परंतु त्यापैकी काही लोक अशी सुद्धा आहेत, ज्यांना औषधं घेण्याची योग्य वेळ सुद्धा माहिती नाही. जर तुम्ही कोणत्याही वेळी औषधं घेत असाल तर असे करणे चुकीचे आहे. तज्ञ असे म्हणतात की, बहुतांश औषधं अशी असतात जी केवळ रात्री झोपण्यापूर्वी घेणे फायदेशीर असते. तर काही औषधं ही दिवसातून दोनवेळेस घ्यायची असतात. त्यामुळे शरिराला त्याचा फायदा होतो. खरंतर व्हिटॅमिन उ, इ12, फोलेट, एल-ग्लूटामाइन आणि लोहयुत्च औषधं ही उपाशी पोटी घ्यावीत असे तज्ञ म्हणतात. मात्र जर तुम्ही डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय स्वतःहून मेडिकल मधून औषध घेऊन ते खात असाल तर तुम्हाला त्या संदर्भात पुरेशी माहिती पाहिजे. तर व्हिटॅमिन अ-ऊ ए आणि ङ युक्त औषधं पचनसाठी वसाची आवश्यकता असते. अशी औषधं ही जेवल्यानंतर खावीत. तसेच ज्या औषधांमध्ये कॅल्शिअम आणि जिंक असते, ती पचण्यासाठी पोटाला ॲसिडची गरज असते. त्यामुळे याचे सेवन जेवल्यानंतर केले पाहिजे. बी कॉम्प्लेक्स असणारी औषधं तुम्ही नाश्तानंतर खाणे योग्य असते. कारण याचे सेवन केल्यानंतर तुम्हाला संपूर्ण दिवसभर उत्साही वाटत राहते. परंतु बहुतांश लोक विविध प्रकारची औषधं-गोळ्या एकाच वेळी घेतात. यामुळे ते आजारी पडू शकतात हे त्यांना माहिती नसते. त्यामुळे डॉक्टरांनी सांगितलेल्या वेळेतच तुम्ही औषधं घेतली तर फायदेशीर ठरेल.




## डायजेस्टिव्ह बिस्किट खाने फायदेशीर असतात का?

सकाळच्या चहासोबत बिस्किट खायला कोणाला आवडत नाही. मार्केटमधून लोक आपल्या आवडीची बिस्किटस खरेदी करतात. आजकाल डायजेस्टिव बिस्किट्स सुद्धा फार आवडीने खाल्ली जातात. ही बिस्किट्स खाल्ल्याने वजन वाढत नाही आणि हेल्दी राहतो असे सांगितले जाते. मात्र खरंतर असे नसते. अशा बिस्किट्समध्ये साखरेचे प्रमाणे फार कमी असते पण याचा अर्थ असा नाही ते हेल्दी असतात.

सेलिब्रेटी न्युट्रिशनिस्ट असे सांगतात की, सामान्य बिस्किटांच्या तुलनेत डायजेस्टिव्ह बिस्किट्समध्ये काही असे इंग्रेटिएंट्स असतात ज्यामध्ये हाय फायबर आणि प्रोटीन असतात. जर त्याचे मर्यादित प्रमाणात सेवन केले तर त्याला हेल्दी ऑप्शन मानले जाऊ शकते. खरंतर डायजेस्टिव्ह बिस्किटमध्ये साखर, मीठ, अनहेल्दी फॅट्स आणि प्रोसेस्ड पीठाचा वापर केला जातो. त्यामुळे या मध्ये कॅलरीज अधिक असतात.

डाइजेस्टिव्ह बिस्किटमध्ये मीठ असते. चार डाइजेस्टिव्ह बिस्किटमध्ये बटाट्याच्या चिप्सच्या समान सोडियम असू शकते. यामध्ये बॅड कॅलरीज आणि अनहेल्दी फॅट्स सुद्धा असतात. तसेच यामध्ये कोणतेही व्हिटॅमिन आणि मिनिरल नसतात. खरंतर डाइजेस्टिव्ह बिस्किटवर खुप प्रोसेस केली जाते आणि त्यांची शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी प्रिजर्वेटिव्ससुद्धा मिक्स केले जातात. यामध्ये जवळजवळ 10 टक्के सॅच्युरेटेड फॅट असते जे खरंतर अनहेल्दी असते. त्यामुळे जर तुम्हाला योग्य डाइजेस्टिव्ह बिस्किट निवडायचे असेल तर त्यावरील न्युट्रिशन प्रोफाइल पहा. तसेच त्यामध्ये किती सोडियम आहे हे सुद्धा पहा.



## ...मुलांची उंची वाढवण्यासाठी करा 'हे' उपाय



उंची न वाढण्याची काही अन्य कारणे देखील असू शकतात. परंतु, शरीरात पौष्टिक घटकांची कमतरता हे मुख्य कारणांपैकी एक मानले जाते. सध्याच्या बदलत्या जीवनशैलीचा मुलांच्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. कमकुवत आहारामुळे त्यांचे शरीर योग्य प्रकारे वाढत नाही आणि त्याचा परिणाम त्यांच्या उंचीवर देखील होतो. उंची कमी असल्याने, बऱ्याच वेळा मुलांची चेष्टा देखील केली जाते, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. उंची न वाढण्याची काही अन्य कारणे देखील असू शकतात. परंतु, शरीरात पौष्टिक घटकांची कमतरता हे मुख्य कारणांपैकी एक मानले जाते. अशावेळी मुलांसह पालक देखील चिंताग्रस्त होतात. मात्र, चिंता सोडून आपल्या मुलांच्या आहारात काही विशिष्ट घटकांचा समावेश केला पाहिजे. चला तर, जाणून घेऊया अशाच काही सुपरफूड्सबद्दल, ज्यांच्या समावेश मुलांच्या आहारात केला, तर त्यांचे शरीर मजबूत बनण्यासह उंची वाढवण्यात देखील उपयुक्त ठरू शकते.

- अंडी – अंडी मुलांची उंची वाढवण्यासाठी खूप फायदेशीर ठरतात. अंडी प्रोटीनचा एक चांगला स्त्रोत मानला जातो, तसेच त्यात रायबोफ्लेविन हा घटक देखील आढळतो. हे दोन्ही घटक शरीराच्या वाढीसाठी चांगले मानले जातात.
- दूध – आपण आपल्या बालपणात वडिलधाऱ्यांकडून असे ऐकले असेल की, तुम्हाला लवकर मोठे व्हायचे असेल, तर दूध प्यायले पाहिजे. वास्तविक दूध हा कॅल्शियमचा मुख्य स्रोत मानला जातो. यामुळे शरीराची हाडे विकसित होतात. हाडांचे वस्तुमान आणि हाडांच्या घनतेच्या विकासात दूध मदत करते. शरीराच्या विकासासाठी हाडांचा विकास खूप महत्वाचा आहे. अशा परिस्थितीत मुलांची उंची वाढवण्यात दूध उपयुक्त ठरते.
- अश्वगंधा – अश्वगंधा हा आयुर्वेदात औषधी गुणधर्मांचा खजिना मानला जातो. याचा उपयोग बऱ्याच समस्यांपासून मुक्त होण्यासाठी केला जातो. मुलांच्या आहारामध्ये अश्वगंधाची पावडर सामील केल्यास, त्यांचे शरीर मजबूत आणि कणखर बनते. तसेच उंची देखील चांगली वाढते. परंतु, यासाठी वैद्यकीय सल्ला घेणे बंधनकारक आहे.
- सोयाबीन – मुलांच्या आहारात सोयाबीनचा समावेश करावा. सोयाबीन प्रथिने समृध्द असतात, जे शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असतात. प्रथिने हाडे आणि स्नायू तयार करण्यात आणि त्यांना विकसित करण्यात मदत करतात. अशा वेळी, ते उंची वाढवण्यात देखील प्रभावी ठरू शकतात.
- कडधान्य – मुलांना आहारात अक्खी कडधान्य खाण्याची सवय लावा. आपण स्प्राउट्स म्हणूनहे त्यांना खाण्यास देऊ शकता. यात अनेक प्रकारचे पोषक घटक असतात. कडधान्य खाल्ल्याने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे, तांबे, मॅंगनीज, जस्त आणि लोह या सर्व पोषक गोष्टी मुलांच्या शरीरात पुरेशा प्रमाणात जातात. याचा परिणाम त्यांच्या वाढीवर देखील होतो.
- आवळा – व्हिटामिन सी समृद्ध असलेला आवळा उंची वाढवण्यात देखील उपयुक्त मानला जातो. हा शरीरातील हार्मोन्स संतुलित करतो आणि मेंदूला चालना देतो.

## रोज भात खाल्ल्याने शरीरावर कोणते परिणाम होतात?

भात खाणे अनेकांना आवडते. काही लोक त्यांच्या आहारात चपातीऐवजी केवळ भाताचा समावेश करतात. खरंतर चपाती ऐवजी भात बनवणं देखील खूप सोपं आहे. मात्र, काही लोक असेही आहेत, जे भाताला हातही लावत नाहीत. कारण, भात खाल्ल्याने त्यांचे वजन वाढते. ज्यांना मधुमेहाची समस्या आहे, त्यांनी भात कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. डाळ, राजमा, छोलेसोबत भात खाणे बहुतेकांना आवडते. पण तुम्हाला माहिती आहे का की, जास्त प्रमाणात भात खाल्ल्याने शरीराला हानी पोहोचते. चला जाणून घेऊया भात खाण्याचे दुष्परिणाम...

पोट फुगण्याची समस्या – भात खाल्ल्याने पोट लवकर भरते आणि पोट फुगण्याची समस्याही दिसू लागते. भात खाल्ल्यानंतर लगेच झोपणे योग्य नाही. मात्र, भाताचे वैशिष्ट्य म्हणजे तो लवकर पचते. यामुळे तुम्हाला पुन्हा भूक लागायला लागते आणि तुम्ही दिवसभर काही ना काही खात राहता. यामुळे तुमचे वजन वाढू शकते.

साखरेची पातळी वाढते – भातामध्ये कॅलरीजचे प्रमाण जास्त असते. जास्त प्रमाणात भात खाल्ल्याने मधुमेहाचा धोका वाढू शकतो. भातामुळे शरीरातील साखरेची पातळी वाढते. अशा स्थितीत मधुमेहाच्या रुग्णांनी भाताचे सेवन अजिबात करू नये.

वजन वाढते – शिजवलेल्या भातामध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप जास्त असते, त्यामुळे दररोज भात खाल्ल्याने वजन वाढू शकते. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी भात मर्यादित प्रमाणात खावा.

गॅसची समस्या – जर तुम्ही भात खाण्याची शौकीन असाल, तर पांढऱ्या तांदळाऐवजी तुम्ही ब्राऊन राईस खाऊ शकता. हे तांदूळ जास्त आरोग्यदायी आहे. पांढऱ्या तांदळात फायबरचे प्रमाण जास्त नसते. अशा स्थितीत ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने गॅसची समस्या होऊ शकते. कधीकधी पोट जड आणि फुगलेले देखील दिसते.

शरीरात सुस्तपणा जाणवतो – ऑफिसमध्ये किंवा घरी जेवणाच्या वेळेत पोटभर भात खाल्ल्यास जेवल्यानंतर काही वेळातच झोप येऊ लागते. असे घडते, कारण तांदूळ शरीरातील साखरेचे प्रमाण वाढवण्याचे काम करतो. भात खाल्ल्याने शरीर सुस्त होऊन आळस वाढतो.



## नारळाचे पाणीच नाही तर मलई खाण्याचेही आहेत फायदे

फक्त नारळच नाही तर त्याची मलाई देखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. नारळाच्या मलाईमध्ये प्रथिने, तांबे आणि मॅंगनीज सारखे अनेक पोषक असतात. कॉपर हाडांसाठी खूप फायदेशीर आहे. यासोबतच हे हृदय निरोगी ठेवण्याचे काम करते. नारळाची मलई खाल्ल्याने तुमचा चयापचय रेटही वाढतो. नारळाची मलईच नाही तर तेल, दूध आणि इतर अनेक प्रकारे तुम्ही ते घेऊ शकता. कोकोनट मलई तुमच्या आरोग्यासाठी इतरही अनेक फायदे देते. येथे जाणून घेऊया.



- हृदय निरोगी ठेवते – नारळाची मलई हृदयाच्या आरोग्यासाठी चांगली असते. यामुळे चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते. हृदयाशी संबंधित समस्या दूर ठेवतात. हे खराब कोलेस्ट्रॉल कमी करते.
- पचन संस्था – रळाच्या मलईमध्ये जास्त फायबर असते. नारळाची मलई खाल्ल्याने तुमची पचनक्रिया निरोगी राहते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळीही नियंत्रणात राहते.
- प्रतिकारशक्ती वाढवते – नारळाच्या मलईमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि मॅंगनीजसारखे पोषक असतात. नारळाची मलई रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्याचे काम करते. नारळाच्या मलईने तुम्ही स्वतःला अनेक आजारांपासून वाचवू शकता.
- मेंदूसाठी फायदेशीर – नारळाची मलई तुमच्या मेंदूचे कार्य सुधारते. नारळाची मलई खाल्ल्याने स्मरणशक्ती तीक्ष्ण होते. मलाई तुमच्या मेंदूचे कार्य वाढवते.
- वजन कमी होते – नारळाची मलई खाल्ल्याने वजन झपाट्याने कमी होण्यास मदत होते. नारळाच्या मलईमध्ये भरपूर फायबर असते. ही मलई खाल्ल्याने तुमचे पोट जास्त काळ भरलेले राहते. तसेच वजन कमी करण्यास मदत होते.
- ऑक्सिडेटिव्ह ताण प्रतिबंधित करते – नारळाच्या मलई मध्ये अँटिऑक्सिडेंट गुणधर्म असतात. हे अँटिऑक्सिडंट गुणधर्म तुमच्या शरीराला फ्री रॅडिकल्सच्या नुकसानीपासून वाचवतात. या मलईसह, आपण ऑक्सिडेटिव्ह तणाव टाळू शकता.
- शरीर थंड राहते – मलई खाऊन, तुम्ही उष्णतेवर मात करू शकता. नारळाची मलई तुम्हाला ऊर्जा देते. याच्या मदतीने तुम्ही उष्णतेशी लढू शकता. मलई खाल्ल्याने शरीर थंड राहते. मलई तुमच्या शरीरात पाण्याची कमतरता होऊ देत नाही.

## नॉन व्हेज नाही खाल्ल तर काय होत...?



तब्बल एक महिन्यांसाठी मासांहर करणे सोडल्यास शरीरात होतात सकारात्मक बदल. हे बदल पाहून तुम्हीही आश्चर्यचकित व्हाल... कट्टर नॉन व्हेजिटेरियन असणाऱ्या खवय्यांना अचानक मासांहार सोडण्यास सांगितल्यावर ते सहाजिकच त्यांना अवघड जाईल. नॉन व्हेजिटेरियन व्यक्तींना एक महिन्यासाठी नॉन व्हेज न खाण्यास सांगितले तर त्याच्या शरीरात अनेक बदल होतात. मात्र हे बदल सकारात्मक असतात. जाणून घेऊया हे बदल नक्की कसे होतात. वैदयकिय तज्ञांनी एका इंग्रजी वेबसाइटला दिलेल्या माहितीनुसार, हिरव्या पालेभाज्या म्हणजेच पूर्णपणे शाकाहरी जेवण खाल्ल्यास शरीरासाठी फायदेशीर ठरते. कारण शाकाहरी पदार्थांमध्ये जास्तप्रमाणात फायबर असते. त्यामुळं पचनसंस्था मजबूत होते व पोटाच्या अनेक तक्रारी कमी होतात. जर तुमचे पोट निरोगी असेल तर तुमचं संपूर्ण शरीर स्वस्थ असते, असं तज्ञांनी म्हटलं आहे. वर्ल्ड इकोनॉमिक फोरमच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही वर्षांपासून जगभरातील खासकरुन अमेरिका आणि युरोप या शहरांतील लोक शाकाहारी जेवणाकडे वळत आहेत. कट्टर मासांहारी लोक हळूहळू शाकाहारी जेवणाकडे वळण्याची अनेक कारणे आहेत. नैतिक, पर्यावरणातील चिंता ते आरोग्याच्या फायद्यांपर्यंत आणि शाकाहारी अन्नाची वाढती उपलब्धता, अशी अनेक कारणे आहेत. त्यामुळं मासांहारी जेवण बंद केल्यामुळं शरीराला अनेक फायदे आहेत. यात हृदयरोग, उच्च रक्तदाब, टाइप-२ मधुमेह आणि काही प्रकारच्या कॅन्सर या आजारांचा धोका कमी होतो. त्याचप्रकारे आहारात वेगवेगळ्या पदाथार्चे शाकाहारी जिन्नस समाविष्ट करा. जेणेकरुन नॉनव्हेज पदाथार्तून मिळणारे पोषण तुम्हाला शाकाहारी पदार्थांमधूनही मिळेल. तुम्ही एक महिन्यांसाठी मसांहारी जेवण बंद केल्यास तुमच्या शरीरात

# धावत्या लोकलमध्ये ओंकारने प्राध्यापक आलोक यांना संपवलं मग...
# मालाडच्या भयंकर घटनेचा नवा सीसीटीव्ही फुटेज समोर







■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईत एक भयंकर घटना घडली, ज्याने मुंबईकरांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. शनिवारी संध्याकाळच्या सुमारास मालाड रेल्वे स्टेशनवर घडलेल्या या रक्तरंजित घटनेने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. येथे एका तरुणाने धावत्या लोकलमध्ये एका प्राध्यापकाची हत्या केली. या घटनेचं नवीन सीसीटीव्ही फुटेजमध्ये आता समोर आलं आहे. अगदी किरकोळ भांडणातून ही घटना घडल्याची माहिती आहे. आलोक सिंग असं हत्या करण्यात आलेल्या प्राध्यापकाचं नाव असल्याची माहिती आहे. तर, ओंकार शिंदे असं हत्या केलेल्या आरोपीचं नाव आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

धक्कादायक आणि चिंताजनक बाबा म्हणजे ही घटना कुठल्या निर्जन स्थळी नाही तर धावत्या लोकल ट्रेनमध्ये, गर्दीच्या वेळी सर्वांसमोर घडली. ट्रेन गर्दीने गजबजलेली होती, स्टेशन जवळ येत होतं, ट्रेनचा वेग मंदावला होता आणि प्लॅटफॉर्म जवळच होतं. सगळे उतरण्याच्या तयारीत होते. तेवढ्यात एका तरुणाने धारदार शस्त्र काढलं आणि या प्राध्यापकावर हल्ला केला. त्यानंतर तो ट्रेनमधून खाली उतरला आणि पळून गेला. या घटनेचं नवीन सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. ज्यामध्ये या भीषण घटनेवेळी नेमकं काय झालं हे दिसत आहे.

**नेमकं काय घडलं?**

शनिवारी (२४ जानेवारी) संध्याकाळी प्राध्यापक आलोक सिंग बोरिवली ते मालाड लोकल ट्रेनने प्रवास करत होते. ट्रेन मालाड स्टेशनवर पोहोचताच उतरताना धक्का-बुक्की झाली. दरम्यान, आलोक सिंग आणि ओंकार शिंदे यांच्यात उतरण्यावरुन वाद झाला. आलोक म्हणाले की, ''मला ढकलू नको.'' यावर ओंकारला राग आला. वाद वाढला आणि ओंकारने अचानक त्याच्या खिशात हात घातला. कोणी काही समजू शकेल त्यापूर्व ओंकारने आलोकच्या पोटात वार केलेला होता. हा वार इतका तीव्र होता की, यात आलोक जखमी झाले आणि त्यांना मोठ्याप्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला. जखमी अवस्थेतही आलोक हे प्लॅटफॉर्मवर उतरले, तिथे बाकावर बसून मदतीची वाट पाहत राहिले. पण, जास्त रक्तस्त्रावामुळे त्यांचा मृत्यू झाला सुरुवातीला पोलिसांना वाटल की चाकूने हल्ला झाला आहे. परंतु, तपासात धक्कादायक सत्य समोर आले. ओंकार खेतवाडी परिसरातील एका धातू कारखान्यात काम करतो. त्याच्याकडे लोखंडी टोक असलेले एक धारदार पक्कड होते. त्याने त्या पक्कडचा वापर हल्ला करण्यासाठी केला. नवीन सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे की ओंकारने हल्ला केला आणि मग गदीर्चा फायदा घेत तो पळून गेला. पोलिसांनी या फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवली आणि बारा तासांच्या आत त्याला अटक केली आहे. तपासादरम्यान, ओंकारने घटनेनंतर ओंकारने प्लायर्स फेकून दिले होते. पोलिस आता त्या शस्त्राचा शोध घेत आहेत. आरोपीचा पूर्वीचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड होता का याचाही तपास केला जात आहे.

## लोणार सरोवराच्या पाण्याची पातळी अचानक २० फुटांनी वाढ



■नागपूर। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील बुलढाणा येथील लोणार सरोवर पुन्हा एकदा चर्चेत आहे. तलावाच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढत असल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणी याचिका दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तलावाच्या वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे जैवविविधतेला धोका निर्माण होऊ शकतो. गेल्या सप्टेंबरमध्ये पाण्याची पातळी वाढण्यास सुरुवात झाली.

या सरोवराभोवती चार मोठे धबधबे आहेत, ज्यातून वर्षाचे १२ महिने पाणी वाहते. या धबधब्यांमुळेच सरोवराची पाण्याची पातळी वाढत असल्याचे मानले जाते. लोणार सरोवरातील पाण्याची पातळी आतापर्यंत १५-२० फुटांनी वाढली आहे. उल्कापातामुळे निर्माण झालेल्या लोणार सरोवराच्या पाण्याची पातळी वाढल्याने, सरोवराच्या काठावरील प्राचीन शिवमंदिर पाण्याखाली गेले आहे. सरोवराचे पाणी कमलजा देवी मंदिरापर्यंतही पोहोचले आहे. या मंदिरासमोरील एक दीपस्तंभही अर्धा बुडाला आहे.

पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, लोणार हे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. तथापि, गेल्या चार महिन्यांपासून झऱ्यांचे पाणी सतत सरोवरात येत आहे. गोड्या पाण्याच्या प्रवाहामुळे सरोवराची खारटता कमी होऊ लागली आहे.

नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर आणि राज वाकोडे यांनी अधिवक्ता मोहित खजानची यांना या प्रकरणी याचिका दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. सरकारने तलावाच्या सभोवतालच्या परिसराची चौकशी करण्याचे आदेशही दिले आहेत.

# दुकान सुरू ठेवण्यासाठी मागत होते लाच
## पान वाल्यासह एका कॉन्स्टेबल अटक, दुसरा फरार

■मुंबई। प्रतिनिधी,

'गुडलक' म्हणत लाच मागणाऱ्या दोन कॉन्स्टेबलचा पदार्फाश केला आहे. एका सिगारेट विक्रेत्याला धमकावून पैसे उकळण्याचा हा प्रकार असून, कारवाईदरम्यान एक कॉन्स्टेबल आणि पानटपरी चालकाला अटक करण्यात आली आहे, तर दुसरा कॉन्स्टेबल फरार आहे.



तक्रारदार सिगारेट विक्रेत्याच्या म्हणण्यानुसार, आरोपी कॉन्स्टेबल राजेंद्र शिवाजी व्यवहारे आणि राजेंद्र सजेर्राव आंबीलवाड यांनी विक्रेत्याला परवाना नसताना परदेशी सिगारेट विक्री करत असल्याचा आरोप करत अडकवण्याची भीती दाखवली. गोल देऊळ परिसरात बोलावून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात आली. ही कारवाई टाळण्यासाठी सुरुवातीला ४० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. तसेच व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी दरमहा १० हजार रुपये द्यावे लागतील, असेही स्पष्टपणे सांगण्यात आले. नंतर तडजोड करत लाचेची रक्कम २० हजार रुपये निश्चित करण्यात आली.

लाच देण्याऐवजी संबंधित व्यापाऱ्याने थेट १९ जानेवारी रोजी एसीबीकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खातरजमा करण्यासाठी सलग तीन दिवस पडताळणी करण्यात आली. त्यात लाच मागितल्याचे स्पष्ट झाल्यानंतर २२ जानेवारी रोजी अइउ कडून सापळा रचण्यात आला.

कारवाईदरम्यान आरोपी कॉन्स्टेबलपैकी एकाने तक्रारदाराला पहिल्या हप्त्याचे १५ हजार रुपये अलंकार चौक येथील एका पानटपरीवर देण्यास सांगितले. दुसऱ्या कॉन्स्टेबलने फोनवरून राजसिंह शिवकुमार सिंह म्पाहणजेच पानटपरी चालकाला पैसे स्वीकारण्याचे आदेश दिले. तक्रारदाराने सांगितलेल्या ठिकाणी पैसे दिल्यानंतर पानटपरी चालकाने ती रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. त्यानंतर संबंधित कॉन्स्टेबललाही ताब्यात घेण्यात आले. मात्र दुसरा आरोपी कॉन्स्टेबल कारवाईआधीच पसार झाला.

या प्रकरणानंतर अटक केलेल्या आरोपींच्या कल्याण आणि ठाणे येथील निवासस्थानी झडती सुरू असून, कॉन्स्टेबलच्या ताब्यातून मोबाईल फोन आणि काही रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. पोलिस दलातील लाचखोरीचा हा प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली असून, फरार आरोपीचा शोध सुरु आहे.

# ठाणे शहरात १२ दिवस टप्प्याटप्प्याने पाणीकपात



■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे येथील भातसा नदीवरील बंधाऱ्यावर बसवण्यात आलेल्या न्युटिक गेट सिस्टीमच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम २७ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणार असल्याने नदीतील पाण्याची पातळी कमी करण्यात आली आहे. परिणामी पिसे येथील उदंचन केंद्रातील पाण्याची पातळी घटली असून, ठाणे महापालिकेला मिळणारा पाणीपुरवठा सुमारे २० टक्क्यांनी कमी झाला आहे. या पार्श्वभूमीवर ठामपाने शहरात पुढील १२ दिवस टप्प्याटप्प्याने पाणीकपात करण्याचा निर्णय घेतला असून, विविध विभागांमध्ये २४ तासांचे पाणी शटडाऊन घेण्यात येणार आहे. काही भागांत कमी दाबाने तर काही भागांत पूर्णपणे पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

२८ जानेवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत रोज वेगवेगळ्या प्रभागांमध्ये सकाळी ९ ते पुढील दिवशी सकाळी ९ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहील. वागळे, वर्तकनगर, कळवा, मुंब्रा, कोपरी, राबोडी, माजीवाडा, मानपाडा, ढोकाळी, कासारवडवली आदी प्रमुख भागांचा समावेश आहे. दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत नागरिकांनी पाणीसाठा करून ठेवावा, पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन ठाणे महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्याच्या म्यूल अकाउंट उघडत केली लाखोंची फसवणूक... मुलाच्या कुटुंबाला बसला धक्का

■मुंबई। प्रतिनिधी,

दहिसरमध्ये सायबर फसवणुकीचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सायबर फसवणूक करणाऱ्यांनी १८ वर्षांच्या एका शालेय विद्यार्थ्याला लक्ष्य केले. विद्यार्थ्याचे आधार आणि पॅन कार्ड वापरून, फसवणूक करणाऱ्यांनी 'म्यूल अकाउंट' उघडले आणि लाखो रुपयांचे संशयास्पद व्यवहार केले. हे समजताच पीडितेचे कुटुंब हताश झाले. यानंतर दहिसर पोलिसांनी अज्ञात फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध फसवणूक तसेच आयटी कायद्याच्या विविध कलमांखाली एफआयआर दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

पोलिसांना दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले की, हा संपूर्ण कट त्याच्या वर्गमित्र तसेच मित्राने रचला होता. त्यांनी त्याला एका फायदेशीर व्यापार योजनेत आमिष दाखवले आणि त्यामध्ये गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणात नफा मिळेल, असे आश्वासन दिले. व्यापारासाठी खाते उघडण्याच्या बहाण्याने आरोपींनी विद्यार्थ्याच्या आधार




कार्ड, पॅन कार्डच्या प्रती आणि २ पासपोर्ट आकाराचे फोटो मिळवले. तसेच, फसवणूक करणाऱ्यांनी विद्यार्थ्याच्या नावाने जारी केलेले एक नवीन सिम कार्डदेखील मिळवले. खाते उघडल्यानंतर आरोपींनी संपूर्ण बँकेचे किट आणि सिम कार्ड स्वतःकडे ठेवले. विद्यार्थ्याला खात्यामधील कोणत्याही व्यवहारांची माहिती होऊ नये.

काही काळानंतर जेव्हा विद्यार्थ्याला संशय आला, त्याने त्याचे सिम कार्ड परत मागितले. तेव्हा आरोपीने ते परत करण्यास स्पष्ट नकार दिला आणि सबबी सांगू लागला. आरोपीच्या बदललेल्या स्वभावामुळे घाबरलेला विद्यार्थी घरी गेला. त्याने संपूर्ण घटना त्याच्या वडिलांना सांगितली. वडील ताबडतोब बँकेत गेले आणि खात्यामधील व्यवहारांची माहिती घेतली. त्यांनतर संपूर्ण कुटुंबाला धक्का बसला. बँकेच्या स्टेटमेंटमध्ये असे दिसून आले की विद्यार्थ्याच्या नावाने खात्यात १३.८ लाख रुपये जमा करण्यात आले होते. त्यानंतर लगेचच, १३.७ लाख रुपये इतर खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आले होते. हे खाते गोठवण्यासाठी विद्यार्थ्याच्या वडिलांनी थेट बँक अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि त्यानंतर ते मुलाला दहिसर पोलिस ठाण्यात घेऊन गेले. पोलीस आता पैसे कुठून आले आणि ते इतर कोणत्या खात्यांमध्ये हस्तांतरित केले? याची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# आईने १५ वर्षाच्या मुलीची दगडी जात्याने डोकं ठेचून केली हत्या

■मुंबई । प्रतिनिधी,

नालासोपारा येथून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आईनेच आपल्या लेकीला बेदम मारहाण करत डोक्यात दगडी जातं घालून तिची हत्या केली. मृत मुलीचं वय वर्षे १५ होते. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे. ही घटना नालासोपाऱ्यातील टांडा पाडा परिसरात घडल्याचं वृत्त आहे. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. मृत मुलीचं नाव अंबिका प्रजापती असे होते, तर हत्या करण्यात आलेल्या महिलेचं नाव कुमकुम असे आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आईनेच मुलीचं डोकं दगडाने ठेचलं आहे. घटनास्थळी एक पथक पोहोचले असता, त्याच ठिकाणी मुलीच्या मृतदेहासह आई उपस्थित होती. नंतर मृतदेह शवविच्छेदनासठी पाठवला. आरोपी कुमकुमच्या देखील मुसक्या आवळल्या आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

**हत्येमागेचं कारण आलं समोर**

पोलिसांनी सांगितलं की, हत्या करण्यात आलेली मुलगी ही पाचही भावंडांमध्ये थोरली होती. मुलीनं आपल्या लहान भावंडांना त्रास दिला, तसेच मारहाण केली होती. याच रागातून आईने आपल्याच मुलाच्या डोक्यात दगडी जात्याने हल्ला करत मुलीला संपवलं, या हल्ल्यात मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**आईने मुलीच्या डोक्यात दगडी जात्याने हल्ला करत संपवलं**

घडलेल्या घटनेनुसार, अंबिका ही लहान भावंडांना अनेकदा मारहाण करायची. याच रागातून कुमकुम प्रजापतीने मुलीच्या डोक्यात जात्याने हल्ला करत डोकं ठेचत खून केला. ही घटना शनिवारी सायंकाळी ४.३० वाजता घडल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणाची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान आरोपी आईला ताब्यात घेण्यात आले आहे.



# नवऱ्याची सटकली थेट डोक्यात हल्ला करत संपवलं

■मुंबई । प्रतिनिधी,

बिहारची राजधानी पाटणा येथे एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नवऱ्याने बायकोवर वरवंट्याने हल्ला करत हत्या केली. बायको एका धार्मिक मिरवणुकीत बराच वेळ नाचत होती. पण हेच कुठेतरी नवऱ्याला खटकलं होतं. हाच राग मनात ठेवून नवऱ्याने तिला संपवलं. या घटनेची माहिती पोलिसांना समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी आरोपी पती हा संतापला असून पोलीस शोध घेत आहेत.



कुटुंबाच्या तक्रारीवरून पोलिसांनी एफआरआय दाखल केला. घटनास्थळी एफएसएल पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. नंतर त्यांनी तपास सुरु करत घटनास्थळावरून पुरावे गोळा केले होते. एसडीपीओ यांनी सांगितलं की, या प्रकरणाचा पोलीस पुढील तपास करत आहेत. दरम्यान पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. नंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला.

घटनास्थळी असलेल्या उपस्थितांनी दिलेल्या माहितीनुसार, हे कुटुंब मूळचे जहानाबादचे आहे. पत्नी एका मिरवणुकीत नाचत होती. पती नाराज झाला आणि नंतर दोघांमध्ये वाद उसळला. नंतर संतापलेल्या पतीने वरवंटा उचलून पत्नीवर हल्ला चढवला.

**पतीने पत्नीच्या डोक्यात वरवंट्याने हल्ला करत संपवलं**

पाटणाच्या सचिवालयाचे एसडीपीओ-2 साकेत कुमार यांनी सांगितलं की, शास्त्रीनगर परिसरात आर मंदिरावर एका खूनाची तक्रार दाखल करण्यात आल्याचं वृत्त आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, पतीनेच आपल्या पत्नीच्या डोक्यात वरवंट्याने हल्ला करत संपवल्याची माहिती समोर आली. नंतर तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# वाईतील सराफ व्यावसायिकाचा मुलगा आठ दिवसांपासून बेपत्ता
## अखेर पुण्यातील लॉजवर आढळला मृतदेह

■पुणे । प्रतिनिधी,

वाई (जि. सातारा) येथील सराफ व्यावसायिकाचा २७ वर्षीय मुलगा गेल्या आठ दिवसांपासून बेपत्ता होता. मात्र, पुण्यातील लॉजमध्ये या बेपत्ता असलेल्या मुलाचा गळफास घेतल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित तरुणाने पुण्यातील कॅम्प परिसरातील मुकेश लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं काल रात्री उघडकीस आलं. आत्महत्येचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालं नसलं तरी आर्थिक नुकसानीतून आलेल्या नैराश्यातून पीडित तरुणाने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

**लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या...**

पियुष अशोक ओसवाल (रा. कन्याशाळेजवळ, ३६५ मधली आळी, ता. वाई, जि. सातारा) असं मृत तरुणाची ओळख समोर आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, 24 जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास कॅम्प परिसरातील मुकेश लॉजमध्ये एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती बंडगार्डन पोलीस स्टेशनमध्ये फोनवरून मिळाली. घटनेची माहिती मिळताच, बंडगार्डन पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यावेळी लॉजमधील रूममध्ये पियुष ओसवालचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला.

**आठ दिवसांपासून बेपत्ता**

प्रकरणाच्या तपासादरम्यान अधिक चौकशी केली असता, पियुष गेल्या आठ दिवसांपासून घरातून बेपत्ता असल्याचं निष्पन्न झालं. या काळात, तो दिवस पुण्यातील एका मित्राकडे थांबला असल्याची देखील माहिती मिळाली आणि त्यानंतर त्याने कॅम्प परिसरातील मुकेश लॉजमध्ये खोली भाड्याने घेऊन तिथे आत्महत्या केल्याचं सांगितलं जात आहे.

वृत्तानुसार, पियुष ओसवाल हा एका सराफ व्यावसायिकाचा मुलगा असून सट्टा व्यवहारात मोठी रक्कम गमावल्यामुळे तो आर्थिक अडचणीत सापडला होता. याच आर्थिक नुकसानीतून आलेल्या नैराश्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज तपास अधिकारी ढरक गणेश चव्हाण यांनी व्यक्त केला. सध्या, बंडगार्डन पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असल्याचं सांगितलं जात आहे.

# उपचाराच्या बहाण्याने डॉक्टरने स्वतःच्या काका-काकीला भूलीचे हाय डोस देऊन संपवलं

**तपासात समोर आलेले महत्त्वाचे धागे**

- घरात जबरदस्तीने प्रवेश केल्याचे कोणतेही चिन्ह नव्हते.
- कपाट किंवा सामान अस्ताव्यस्त नव्हते.
- केवळ दागिने गायब असल्याचं दिसून आलं.
- आरोपीचा घरात नियमित ये-जा होती.
- आर्थिक अडचणी आणि कर्जाचा दबाव स्पष्ट झाला.

■मुंबई । प्रतिनिधी,

इलाजावर करणाऱ्या डॉक्टरवर विश्वास होता आणि रक्ताच्या नात्यावरही ठाम भरोसा होता. मात्र हाच विश्वास एका वृद्ध दाम्पत्याच्या जीवावर बेतला. कर्नाटकच्या शिवमोगा जिल्ह्यातील ही धक्कादायक घटना केवळ दुहेरी हत्येची नाही, तर विश्वासघाताचीही आहे. अनोळखी व्यक्तीने नव्हे, तर कुटुंबातीलच डॉक्टर असलेल्या नातलगाने उपचाराच्या नावाखाली भूलिचे इंजेक्शन देत काका-काकीचा जीव घेतल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी अवघ्या २४ तासांत या दुहेरी हत्येचा उलगडा केलाय. संशयाची सुई थेट नातलगाकडे वळली. चौकशीनंतर समोर आलेलं सत्य हादरवून टाकणारं होतं. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला डॉक्टरने काका-काकींच्या सोन्याच्या दागिन्यांच्या लालसेतून हे भीषण कटकारस्थान रचलं. शिवमोगा पोलिसांच्या जलद कारवाईमुळे या खुनामागचा काळा अध्याय उघडकीस आला.

ही घटना भद्रावतीतील भूतानागुडी परिसरातील आहे. येथे राहणारे ७५ वर्षीय चंद्रप्पा आणि त्यांची ६५ वर्षीय पत्नी जयम्मा हे दाम्पत्य घरात मृतावस्थेत आढळले. चंद्रप्पा हे श्करछ मधून निवृत्त कर्मचारी होते. दाम्पत्याला तीन मुलगे असून ते वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. २० जानेवारी रोजी मृत्यूची माहिती समोर येताच परिसरात खळबळ उडाली. प्रकरणाची नोंद ओल्ड टाउन पोलीस ठाण्यात करण्यात आली.

**नातलगच कसा ठरला मारेकरी?**

पोलिस तपासात आरोपी कोण दुसरा नसून चंद्रप्पा यांचा भाचा असल्याचं निष्पन्न झालं. आरोपीची ओळख 44 वर्षीय आयुर्वेदिक डॉक्टर जी. पी. मल्लेश अशी आहे. मल्लेशवर मोठ्या प्रमाणात कर्ज होतं. त्याने काकाकडे आर्थिक मदत मागितली होती; मात्र मदत न मिळाल्याने राग आणि लालसा यांची सरमिसळ होऊन तो गुन्ह्याच्या मार्गावर गेला. पोलिसांच्या मते, घरातील मौल्यवान दागिन्यांवर डल्ला मारणं हा त्यामागचा मुख्य हेतू होता.

**मृत्यूचं इंजेक्शन कसं देण्यात आलं?**

१९ जानेवारी दुपारी मल्लेश काका-काकींच्या घरी गेला. तब्येतीची चौकशी करताना त्यांच्या नसांच्या आजारावर व्हॅरिकोज वेन्स उपचाराची ऑफर दिली. विश्वास संपादन करून त्याने जनरल ॲनेस्थेसिया 'प्रोपोफोल'चा अतिप्रमाणात डोस दिला. सामान्यतः शस्त्रक्रियेत याची मात्रा १ ते २ मिलीग्रॅम असते; मात्र आरोपीने दोघांनाही सुमारे ५० मिलीग्रॅम इंजेक्शन दिलं. या हाय डोसमुळे काही वेळातच दोघांचा मृत्यू झाला.

**२४ तासांत मर्डर मिस्ट्रीचा उलगडा कसा झाला?**

शिवमोगाचे एसपी बी. निखिल यांनी सांगितलं की, क्राइम सीनवरूनच मारेकरी घरातील ओळखीचाच असावा, हे स्पष्ट होतं. त्यानुसार नातलगांची चौकशी सुरू करण्यात आली. २० जानेवारी रोजी आरोपीला ताब्यात घेण्यात आलं. कसून चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सध्या पोलिस भूलीच्या औषधाचा स्रोत, तसेच चोरी गेलेल्या दागिन्यांच्या रिकव्हरीसाठी तपास करत आहेत.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com